# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.10.2025** **वार- शनिवार**

---

**भिडेपुल**

दिवाळी संपताच कोणतीही पूर्वसूचना न देता पुन्हा वाहतुकीसाठी बंद केलेला पुण्यातील भिडे पूल दिवसा खुला करण्याची मागणी सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी आज पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली आहे. मेट्रोच्या कामासाठी एप्रिलपासून सुरू असलेली या पुलावरील बंदी वारंवार वाढवली जात असून, 45 दिवसांत पूर्ण होणारं काम 175 दिवस उलटूनही अपूर्ण आहे, अशी टीका त्यांनी केली आहे. पादचारी पुलांवर प्रचंड खर्च करूनही त्यांचा अल्प वापर होत असल्याचं दिसत असल्याचं मत वेलणकर यांनी नोंदवलं आहे.

**खरवड**

पुणे शहरामध्ये पुढील वर्षी जानेवारीत होणाऱ्या सायकल स्पर्धेच्या निमित्तानं 75 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचं काम पुणे महानगरपालिकेनं नुकतेच हाती घेतलं आहे. यासाठी अनेक रस्त्यांवर खरवडण्यात येत आहे. रस्ते खरवडून झाल्यानंतर त्यावर त्वरित डांबर काम करण्यात येत आहे. या रस्त्यांवरून वाहनं चालवताना नागरिकांनी सुरक्षितपणे आणि जपून वाहनं चालवावीत, अशी विनंती मनपाद्वारे एका पत्रकातून करण्यात आली आहे. अत्यंत अल्पकाळासाठी नागरिकांना थोड्या असुविधांचा सामना करावा लागणार आहे, तरी सर्व नागरिकांनी सहकार्य करावं, असं आवाहन या पत्रकामध्ये करण्यात आलं आहे.

**कचरा**

दिवाळीच्या पाच दिवसांमध्ये पुणे शहरात तयार झालेल्या अतिरिक्त 750 टन कचऱ्याची विल्हेवाट पुणे महापालिकेनं लावली आहे. नरकचतुर्दशी ते भाऊबीज या काळात प्रत्येक दिवशी सर्वसाधारण 150 टन अतिरिक्त कचरा तयार झाला. यामध्ये फटाके, भेटवस्तूंचे कागद यासह दिवाळीनिमित्त बाहेर काढण्यात आलेल्या जुन्या वस्तूंचा कचरा याचा समावेश

होता, अशी माहिती महापालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त संदीप कदम यांनी आज दिली. पुणे शहरात दररोज सर्वसाधारण 2500 ते 2600 टन कचरा तयार होतो. दिवाळीच्या काळात यामध्ये वाढ होऊन हे प्रमाण 2900 टनापर्यंत गेलं.

**हवाप्रदूषण**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात यंदा दिवाळीत गेल्या वर्षीच्या तुलनेत हवेच्या गुणवत्तेत सुधारणा नोंदविण्यात आली आहे. दिवाळी सुट्यांमुळं बंद असलेली बांधकामं, रस्त्यांवरील वाहनांची कमी झालेली संख्या आणि पाऊस यामुळं प्रदूषणात घट झाल्याचं निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, पुणे परिसरातील हवा गुणवत्ता निर्देशांक सरासरी 162 होता. त्यात वाकडमधील भूमकर चौकात सर्वाधिक 300 नोंद करण्यात आली. ही हवेची अतिनिकृष्ट पातळी मानली जाते. त्या खालोखाल पुण्यातील लोहगाव इथल्या म्हाडा कॉलनीत हवा गुणवत्ता निर्देशांक 244 नोंदविण्यात आला होता. त्यानंतर पाषाणमधील पंचवटी 121, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ 116, निगडी 108 आणि हडपसर 88 अशी हवा गुणवत्ता निर्देशांकाची नोंद झाली होती.

**नुकसान भरपाई**

राज्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतीबरोबरच पशुधनाचं मोठे नुकसान झाले. पूर्वीच्या नियमानुसार केवळ तीन प्राण्यांसाठी मदत दिली जात होती. त्यामध्ये शिथिलता आणून प्रत्येक जनावराच्या मृत्यूची नुकसान भरपाई पशुपालकांना मिळणार आहे. पशुसंवर्धन विभागाद्वारे आजारी आणि जखमी पशुधनावर उपचार सुरू आहेत अशी माहिती पुणे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी दिली.

**मतदार**

पुणे विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या मतदार यादी नव्यानं तयार करण्याच्या कार्यक्रमाअंतर्गत निवडणूक आयोगाकडून मतदार नोंदणीसाठी ऑफलाईन सुविधेसोबतच ऑनलाईन मतदार नोंदणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विभागातील जास्तीत जास्त पात्र मतदारांनी संकेतस्थळावर 6 नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी, असं आवाहन विभागीय आयुक्त तथा पुणे विभाग पदवीधर आणि

शिक्षक मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केलं आहे.

**<u>सीटीईटी</u>**

राज्यस्तरावरील राज्य परीक्षा परिषदेतर्फे शिक्षक पात्रता परीक्षा आयोजित केली जाते. सीबीएसईने प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, 8 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सीटीईटीमध्ये पेपर 1 आणि पेपर 2 चा समावेश असणार आहे. एकूण 20 भाषांमध्ये ही परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षेबाबतची सविस्तर माहिती, अभ्यासक्रम, पात्रता, परीक्षा शुल्क, परीक्षा केंद्रे असलेली शहरे याबाबतचा तपशील स्वतंत्रपणे जाहीर केला जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी ctet.nic.in या संकेतस्थळाला भेट देण्याचं  आवाहन करण्यात आलं  आहे.

**<u>निधन</u>**

पुण्यातील सामाजिक कार्यकर्त्या आणि मराठी माझा अभिमान या संस्थेच्या संस्थापिका मीनल देशमुख यांचं अल्पशा आजारानं नुकतंच  निधन झालं. त्या 56 वर्षांच्या होत्या. ‘मराठी माझा अभिमान’ या संस्थेमार्फत मराठी समुदायाला जोडण्याचं काम त्या करीत होत्या. मराठी भाषा आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले.

**<u>वॉलीबॉल</u>**

पुणे जिल्हा वॉलीबॉल संघटनेच्या वतीनं दौंड इथं 16 वर्षाखालील गटाच्या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत पुण्यासह सोलापूर आणि अहिल्यानगरमधील खेळाडू सहभागी झाले होते. यातून विभागाचा संघ तयार करण्यात आला असून यामध्ये पुण्याच्या खेळाडूंनाही स्थान देण्यात आलं आहे. गेल्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धेत खेळलेली पुण्याची सिद्धी सणस हिच्याकडं मुलींच्या गटाचं तर राजवीर भोसले याच्याकडं मुलांच्या संघाचं नेतृत्व सोपवण्यात आलं आहे. आगामी राज्यस्तरीय स्पर्धा जळगाव इथं होणार आहेत.

**<u>टेबल टेनिस</u>**

शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी इथं आजपासून 30 ऑक्टोबरपर्यंत चोपन्नावी आंतर जिल्हा आणि सत्याऐंशीवी राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा सुरू होत आहे.

या स्पर्धेत 25 जिल्ह्यांमधून सव्वाशेहून अधिक संघांमधून अकराशे हून अधिक खेळाडू विविध वयोगटांमध्ये सहभागी होणार आहेत. 11 आणि 13 वर्षांखालील वयोगटाचा अपवाद वगळता अन्य सर्व गटांमध्ये सांघिक लढती होणार आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ होतं. उद्याही असंच हवामान राहून पावसाच्या सरी अपेक्षित असल्याचं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**